# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
**Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


**प्रेसनोट ३०९/२०२२** **दिनांक : ०७/१०/२०२२**

## ऑनलाईन गुन्ह्यांच्या जनजागृतीसाठी सायबर कक्षाने केले तक्रारदारांच्या मेळावाचे आयोजन..

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत कार्यरत असलेल्या सायबर गुन्हे कक्षाने सन २०२२ मध्ये आयुक्तालयातील नागरिकांच्या प्राप्त तक्रारींवर वेळीच व तात्काळ कारवाई करुन माहे सप्टेंबर २०२२ पावेतो एकुण रुपये ५८,००,०००/- (रुपये ५८ लाख ) इतकी रक्कम मुळ तक्रारदार यांना त्यांचे बँक खात्यामध्ये परत मिळवून दिलेली आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या दुसऱ्या वर्धापन दिनानिमीत्त सायबर गुन्हे कक्षाने दिनांक ०६/१०/२०२२ रोजी ऑनलाईन गुन्ह्यांच्या जनजागृतीसाठी तक्रारदार व नागरिकांना बोलावून मेळावाचे आयोजन केले होते. सदर मेळाव्यादरम्यान श्री. अमोल मांडवे, सहाय्यक पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांनी उपस्थितांना प्रचलित सायबर गुन्हयांबाबत माहिती देतांना ऑनलाईन लोन ॲप डाऊनलोड करण्यापुर्वी त्याचे सत्यतेची पडताळणी करावी, कोणताही अनोळखी कॉल आल्यास क्रेडीट कार्ड/बँकेशी संबंधित माहिती देवू नये अथवा ओटीपी शेअर करु नये, क्रेडीट कार्डद्वारे व्यवहार करताना त्याची माहिती कोठेही सेव्ह करु नये. क्रेडीट कार्ड वापर कर्त्याने ट्रान्सक्शनचे प्रत्येक एसएमएस तपासावे, त्यामध्ये काही अनियमितता असल्यास तात्काळ संबंधित बँकेस व सायबर सेलकडे तक्रार करावी व सध्या ५क्र सेवा नव्याने सुरु करण्यात आलेली असल्याने त्याचे संबधित फसवे कॉल, एसएमएस, लिंक प्राप्त झाल्यास त्याला प्रतिसाद देवू नये अशा प्रकारचे मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमाकरिता सायबर गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी/अंमलदार व ४० नागरिक उपस्थित होते. तसेच उपस्थित तक्रारदार/नागरिकांनी **Selfie Frame CYBER CRIME CELL - I Am CYBER SAVIOUR** या बरोबर फोटो काढून **Social Media Account** वर जनजागृती करण्याच्या उद्देशाने प्रसारीत केले आहे.

